महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५

जा. क्र. : औसंवि/ब/ककनिस/५९वी बैठक/ ८९

दिनांक : ०७/०१/२०१५

# परिपत्रक

विषय : म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ५९व्या बैठकीत घेण्यात आलेले निर्णय.

********

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी कल्याण निधी समितीची ५९ वी बैठक दि.२२/१२/२०१४ रोजी प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

- म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या दि. ०५/१०/२०११ रोजी झालेल्या ५२ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार कर्मचाऱ्यांचा सर्वागीण विकास करणे तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविण्याकरिता तत्कालिन म.रा.वि.मंडळात स्थापन करण्यात आलेल्या क्रीडा क्लब ( Sports Club) ला पुनर्जिवित करणे तसेच नव्याने क्रीडा क्लबची स्थापना करण्यासाठी मल्टी जिम, व्यायामाचे साहित्य तसेच खेळांचे साहित्य खरेदी करण्याकरीता संबंधीत क्रीडा क्लबसाठी, ठराविक निकषांची परिपूर्तता करुन सादर केलेल्या प्रस्तावास फक्त एकदा रु. १,००,०००/- (रु. एक लाख मात्र) आर्थिक मदत देण्याबाबत सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. ३२८८६, दि. ०२/११/२०११ अन्वये तरतूद करण्यात आलेली आहे.
  - **सदर तरतूदीमध्ये वाढ करुन** महावितरण व महापारेषण कंपनीच्या बाबतीत उपरोक्त योजना **मंडल स्तरापर्यंत विस्तारीत** करण्यात येत असून रु. १,००,०००/- आर्थिक मदतीसाठी सदस्य संख्या कमीत कमी १०० असावी व क्रीडा क्लबची नोंदणी अत्यावश्यक करण्याबाबत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. तसेच मंडल व परिमंडल कार्यालय एकाच इमारतीत असल्यास अशा ठिकाणी एकाच क्रीडा क्लबसाठी आर्थिक निधी मंजूर केला जाईल. **नोंदणीकृत क्रीडा क्लबची सभासद संख्या ५० पर्यंत असेल तर रु. ५०,०००/- आर्थिक निधी मंजूर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.**
  - काही वीज निर्मिती केंद्रे दुर्गम ठिकाणी असून कर्मचारी संख्या फक्त ५० पर्यंत आहे, अशी २० वीज निर्मिती केंद्रे निरनिराळया ठिकाणी असल्याने तसेच त्या कर्मचाऱ्यांकरिता मनोरंजनाचे साधन म्हणून स्पोर्टस क्लबची अंत्यंत आवश्यकता असल्याने अशा **नोंदणीकृत क्रीडा क्लबची सभासद संख्या ५० पर्यंत असेल तर रु. ५०,०००/- आर्थिक निधी मंजूर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.**
  - महापारेषण कंपनी अंतर्गत काही रिसिव्हिंग स्टेशनस् देखील दुर्गम भागात असून सभासद संख्या ५० पर्यंत आहे. अशा ठिकाणी सुध्दा **नोंदणीकृत क्रीडा क्लबसाठी वरीलप्रमाणे रु. ५०,०००/- आर्थिक निधी मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला.**
- म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ५२ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार **परिपत्रक क्र. ३२८८६, दि. ०२/११/२०११ मधील अनुक्रमांक १,२,३,४,५, ९,१०,११,१२,१३,१४,१६,१९ आणि २० वरील योजनांच्या बाबतीत,** प्रस्ताव सादर करण्यासाठी एक वर्षाची कालमर्यादा घालण्याची बाब प्रशासनाच्या विचारधीन होती. सदर विषयावर बैठकीमध्ये चर्चा होऊन **प्रस्ताव सादर करण्यासाठी दि. ०१ मार्च २०१५ पासून पुढे एक वर्षाची कालमर्यादा** घालण्याबाबत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.
- या पूर्वीचे परिपत्रक क्र. २००८५, दि. २७/०६/२०११, परिपत्रक क्र. १८८३०, दि. ०५/०७/२०१२ तसेच परिपत्रक क्र. २५३३६, दि. १२/०८/२०१४ अन्वये अनुक्रमे भौगोलिक कार्यक्षेत्रानुसार १२ परिमंडलांमध्ये विभागणी, शिष्यवृत्ती वाटपाबाबतच्या कसोटयांमध्ये बदल तसेच परिमंडल निहाय शिष्यवृत्तींच्या संख्येत वाढ अशाप्रकारे विविध बदल करुन देखील **"कमी गुण धारण करणाऱ्या एका परिमंडलातील पाल्याला शिष्यवृत्ती मिळते, परंतु दुसऱ्या परिमंडलातील उत्कृष्ट गुण धारण करणारा पाल्य शिष्यवृत्तीपासून वंचित राहतो. "** हा भेद निर्णयांकित होत नसल्याने शिष्यवृत्ती वाटपाबाबतचा विषय पुन्हा म.रा.वि.मं.कर्मचारी कल्याण निधी समिती समोर चर्चेसाठी मांडण्यात आला होता. सदर विषयावर सर्व समिती पदाधिकारी

व संघटना प्रतिनिधी यांच्यात सर्वसमावेशक चर्चा होऊन सदर तरतूदीमध्ये बदल करण्यात आला असून सन २०१३-१४ पासून पुढे शिष्यवृत्ती वाटपाबाबत **खुल्या प्रवर्गासाठी ६५ टक्के व मागास प्रवर्गासाठी ६० टक्के गुण** धारण करणाऱ्या सर्व पाल्यांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्याच्या अटीवर शिष्यवृत्ती वाटप करण्याबाबत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

- परिपत्रक क्र. ३६४१०, दि. ०२/१२/२०१० अन्वये **गुणवंत कामगार पुरस्कार तसेच राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर विविध क्षेत्रात प्राविण्य प्राप्त केल्यामुळे दिले जाणारे पुरस्कार** कंपनीच्या सेवेत असताना कंपनीचे **अधिकारी / कर्मचारी** यांनी प्राप्त केले तर रोख पारितोषिक देण्याबाबतची तरतूद करण्यात आली आहे. तसेच परिपत्रक क्र. ३२८८६, दि. ०२/११/२०११ अन्वये **मान्यता प्राप्त राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होऊन प्राविण्य संपादन** करणाऱ्या **पाल्यांना** रोख पारितोषिक देण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे.

  **सदर तरतूदींमध्ये बदल करुन,** उपरोक्त दोन्ही तरतूदींच्या बाबतीत एकाच कर्मचाऱ्यास अथवा एकाच पाल्यास अनेक बक्षीसे देण्यात येवू नयेत तसेच सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त कर्मचारी / अधिकारी / कर्मचारी पाल्य यांना व्हावा या दृष्टीकोनातून अधिकारी / कर्मचारी / कर्मचारी पाल्य यांना राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार देण्याबाबतच्या तरतूदीमध्ये मर्यादा घालण्याबाबतचा मुद्दा प्रशासनाच्या विचाराधीन होता. म.रा.वि.मं. क.क.निधी समिती पदधिकारी व संघटना प्रतिनिधी यांच्यांत उपरोक्त विषयाबाबत चर्चा होऊन **कर्मचाऱ्यास सेवाकाळात फक्त एकदाच राज्यपातळीवरील पुरस्कार, एकदाच राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार तसेच एकदाच आंतरराष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार** म.रा.वि.म. कर्मचारी कल्याण निधीमधून देण्याबाबत निर्णय घेण्यात आला व **कर्मचारी पाल्यास, कर्मचाऱ्यांच्या सेवाकाळात फक्त एकदाच राज्यपातळीवरील पुरस्कार, एकदाच राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार तसेच एकदाच आंतरराष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार** म.रा.वि.म. कर्मचारी कल्याण निधीमधून देण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

- सन २०१२-१३ पासून क्रीडा स्पर्धा घेताना **व्हॉलीबॉल, क्रिकेट, कबड्डी - पुरुष** यांच्या स्पर्धे व्यतिरिक्त महिलांची मागणी असल्याने **महिलांकरिता बॅडमिंटन व टेबल टेनिस** या स्पर्धांचा समावेश आंतर कंपनी क्रीडास्पर्धेत **करणेबाबत निर्णय** घेण्यात आला तसेच सद्यस्थितीत ०३ खेळांकरिता रु. ३ लाख अशी तरतूद आहे. तथापि, वरीलप्रमाणे ०२ खेळांचा नव्याने समावेश केल्यामुळे **दोन्ही खेळ मिळून** वाढीव खर्च रु. १,००,०००/- म्हणजेच एकूण ०५ खेळ मिळून रु. ४ लाख देण्याबाबत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

वरीलप्रमाणे निर्णयांची अंमलबजावणी परिपत्रक निर्गमित झाल्याच्या तारखेपासून करण्यात येईल. सदर परिपत्रकास विस्तृत प्रसिध्दी देण्यात यावी.

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या **RAPDRP-Infoportal** या संकेतस्थळावर **Circular-Industrial Relations Department** या ठिकाणी प्रसिध्दीसाठी उपलब्ध करण्यात आली आहे. सदर परिपत्रकाची मुद्रांकित प्रत (Hard Copy) कोणत्याही कार्यालयास देण्यात येणार नाही.

(संजय ढोके)
सदस्य / सचिव, म.रा.वि.मं.क.क.नि.समिती तथा
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी (प्रभारी)

प्रत सविनय सादर :
१) संचालक (वित्त), म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे, मुंबई.
२) कार्यकारी संचालक (मासं), महावितरण / महानिर्मिती / महापारेषण, मुंबई.

प्रत सस्नेह :
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिर्मिती / महापारेषण, मुंबई.
- यांना विनंती करण्यात येते की, महानिर्मिती / महापारेषण कंपनी अंतर्गत सर्व स्तरावर वरीलप्रमाणे निर्णयांची अंमलबजावणी होण्यासाठी परिपत्रकास कंपनी अंतर्गत सर्वत्र विस्तृत प्रसिध्दी देण्याबाबत आपल्या स्तरावर कार्यवाही करावी.